# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार व योगदान

**सोनल धनंजय चव्हाण** Research scholer SNDT University Mumbai Mo. 9225838485

---

**प्रस्तावना**

"शिक्षण म्हणजे सर्वसामान्यांचे प्रबोधन, संघटन म्हणजे जनसामान्यांचे संघटन आणि संघर्ष म्हणजे सर्वसामान्य माणसाने प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध पुकारायचे बंड होय. व्यक्तीला अन्यायाविरूद्ध उठाव करण्याचे सामर्थ्य आणि जाणिव केवळ शिक्षणामुळेच होते" असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वास होता. शुन्यातून सुरूवात करून आपले जीवन किती उंचवता येते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. एखाद्या व्यक्तीची मनोधारणा, वैचारिक, भावनिक, तात्त्विक, नैतिक, न्यायिक, तार्किक, भौतिक, सामाजिक आणि वैज्ञानिक पैलूंना तितक्याच ताकदीने पेलते त्याच वेळी हे शक्य होते. त्यांचे विचार हे काळाच्या पुढे जाणारे शाश्वत मूल्यांचा आग्रह धरणारे आहेत. त्या मुळेच त्याची उपयुक्तता आजही टिकून आहे. त्यांच्या विचारांचा आकर्षित करणारा एक पैलू शिक्षणाशी संबंधीत आहे.

त्यांनी ज्या तत्त्वज्ञानाला देशीय मूलाधार आहे असे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान प्रतिपादन केले. निरक्षर जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिक्षणसंस्थांची स्थापना केली. अमूलाग्र समाजपरिवर्तनाचे अत्यंत मूलगामी साधन म्हणून डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाकडे पाहिले.सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी व सामाजिक लोकशाही प्रस्थापित करायची असेल तर शिक्षण एकमेव राजमार्ग आहे असे त्यांचे प्रतिपादन होते.

प्रगाढ बुद्धीची देणगी लाभलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाशी संबंधित घटकांबाबत आदर्श घालून दिले. त्यात अध्ययन, अध्यापन, व्यवस्थापन, व्यासंग,जीवनविषयक दृष्टीकोन, मूल्ये, कर्तव्ये आणि धारणा यांचा समावेश आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन खूप प्रगल्भ व आधुनिक होता. शैक्षणिक धोरणाचा मूलत: विचार करून समाजात सर्वसमावेशक शिक्षणाची उपलब्धता करून देणारे ते थोर शिक्षणतज्ञ होते. त्यांच्या मते शिक्षण हे जागतिक परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणाने व्यक्तीची विचार करण्याची प्रवृत्ती प्रगल्भ होते व तो स्वत:च्या आणि समाजाच्या हिताच्या दृष्टीने विचार करू लागतो.

प्रस्तुत शोध निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार व शिक्षण विषयक योगदानाचा संक्षिप्त स्वरूपात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार अभ्यासणे.

२) शिक्षणविषयक संविधानात्मक तरतुदींचा मागोवा घेणे.

३) डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य अभ्यासणे.

**संशोधनपद्धती**

प्रस्तुत शोध निबंधा मध्ये दुय्यमस्त्रोतांचा अवलंब करण्यात आला असून या मध्ये या विषयाशी संबंधित प्रकाशित,अप्रकाशित लिखाण, संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, इंटरनेट इ साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे किती द्रष्टे होते हे त्यांच्या शिक्षणविषयक विचारातून स्पष्ट होते. राष्ट्राची प्रगती व समाजाची उन्नती साधायची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. त्या दिशेने डॉ. बाबासाहेबांचे शिक्षणविषयक विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. डॉ. बाबासाहेबांच्या विविधांगी चिंतनानंतर शिक्षण हा समाज उद्धाराचा एकमेव राजमार्ग ठरला असल्याचे ते वारंवार नमूद करतात. त्यांना शिक्षणाचा जो अर्थ अभिप्रेत होता तो केवळ अक्षर साक्षरतेपुरता मर्यादित नव्हता. शिक्षणाचा मुलभूत अर्थ त्यांनी जाणला होता. आपण ज्या परिस्थिती जगतो ते दारिद्र्य सन्मानहीन जीवन व स्वाभिमान शुन्य जगणे संपवायचे असेल तर आपल्या समाजाचे सर्वसमावेशक शिक्षण होणे आवश्यक आहे. विद्या हे शस्त्र आहे त्याचा पुरेपूर उपयोग केल्याशिवाय परिस्थिती परिवर्तन होणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला उद्धारासाठी जो मूलमंत्र दिला त्यातील अत्यंत महत्त्वाचा मंत्र होता शिक्षणाचा. शिका, संघटीत व्हा, चळवळ करा आणि संघर्ष करा. उत्थानाचा महामार्ग हा शिक्षणाच्या महाद्वारातून जातो हे सांगून त्यासाठी सातत्याने अभ्यासाची कास धरण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली.शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे व क्रांतीचे प्रभावी साधन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार हे जनसामान्यांसाठी होते. या भूमिकेतूनच डॉ. बाबासाहेबांचे शिक्षण विषयक विचार संक्षिप्तपणे खालील प्रमाणे सांगता येतील.

१) व्यक्तीला जाणिव करून देण्यासाठी शिक्षण.

२) शिक्षण एक शस्त्रच होय.

३) विषमता नष्ट करण्यास व सामाजिक लोकशाहीसाठी शिक्षण.

४) संघटीत होणे व संघर्षासाठी शिक्षण.

५) समानतेसाठी शिक्षण.

६) शिक्षण एक अन्न व शक्ती होय.

७) शिस्त व विकासासाठी शिक्षणाची गरज.

८) शिक्षण मूल्याधिष्ठीत असावे.

९) शिक्षण एक पवित्र कार्य.

१०) चारित्र्य संवर्धनासाठी शिक्षण. १२) प्राथमिक

११) शिक्षण म्हणजे वाघीणीचे दूध.

शिक्षणाचे सार्वत्रीकरण करणे.

उपरोक्त विचारांना अनुसरून भारतीय समाजाला विज्ञानवादी आणि मानवतावादी विचारांची दृष्टी देणारे भारतीय समाजाला काळोखया अंधारातून बाहेर काढून विकासाच्या, परिवर्तनाच्या स्वच्छ नभांगणात आणणारे थोर युगपुरूष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत.

**डॉ. बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक संविधानात्मक तरतुदी**

भारतातील सामाजिक क्रांतीला भर भक्कम अधिष्ठान व अचूक दिशा देण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे महत्त्वाचे हत्यार आहे अशी त्यांची ठाम विचारधारा असल्याने त्यांच्या समाजचिंतनात त्यांनी शिक्षणाला अग्रक्रम दिला. शिक्षणासाठी आग्रही असणाऱ्या बाबासाहेबांनी शिक्षण विषयक संविधानात्मक तरतुदी केल्या.

घटनेच्या कलम ४५व्या कलमान्वये वयाची १८ वर्षेपूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी शासनव्यवस्थेची असल्याचे त्यांनी तरतूद केली. शिक्षणात धार्मिक प्राबल्य निर्माण होऊ नये यासाठी घटनेतील २८ व्या कलमान्वये पूर्णत: राज्याच्या निधीतून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही अशी तरतूद केली. बाबासाहेबांच्या मते, "सर्वजाती-जमातींना समानतेच्या एका पातळीवर आणण्याचा एकमेव उपाय म्हणजे असमानतेचे तत्त्व नाकारणे हा आहे." भारतीय संविधान भाग ४ मध्ये ३६ ते ५१ यात निर्देशक तत्त्वे प्रस्तुत करण्यात आली आहेत. त्यातील क्र. ३८ मध्ये लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी समाज व्यवस्थेत प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहील. क्र. ३९ मध्ये समान न्याय व कायदेविषयक मोफत सहाय्य उपलब्ध करून देईल. क्र. ४१ मध्ये कामाचा,शिक्षणाचा आणि विविक्षित बाबतीत बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता लोकसाहाय्याचा हक्क उपलब्ध करण्यासाठी शासन परिणामकारक तरतूद करेल. क्र. ४२ मध्ये कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसुती विषयक सहाय्यासाठी तरतूद , क्र. ४५ मध्ये संविधान लागू झाल्यापासून १४ वर्षे सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यात येईल. क्र. ४६ मध्ये अनुसुचितजाती-जमाती व अन्य दुर्बल घटकयांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध संवर्धन करण्यास प्रयत्नशील राहील. राज्यधोरणांच्या निर्देशक तत्त्वांमध्ये संविधानात्मक तरतूदी करून विषमता निर्मूलनाचा भक्कम पाया डॉ.बाबासाहेबांनी रोवला आहे.

३० वे कलम धर्म किंवा भाषा या निकषा नुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शिक्षणसंस्था व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार आहे. कलम ३०(२) नुसार शैक्षणिक संस्थांना सहाय्य देताना राज्य एखादी संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या व्यवस्थापनाअंतर्गत आहे. या कारणावरून तिला प्रतिकूल होईल असा भेदभाव करणार नाही. कलम १५ नुसार राज्य कोणत्याही नागरिकांना प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म,वंश जात, लिंग, जन्मस्थान अशा कारणावरून भेदभाव करणार नाही. सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी विशेष तरतूद केली जाईल .

घटनेतील कलम ३९(क) नुसार उपजिविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री-पुरूष सर्वांना आहे. कलम ३९(ख) नुसार सामाजिक हिताला उपकारक होईल अशा रितीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्त्व व नियंत्रणयाची विभागणी व्हावी. कलम ३९(ब) नुसार पुरूष व स्त्री या दोघांनाही समान कामा बद्दल समान वेतन मिळावे. ३९ (ड) नुसार श्रमिक स्त्री व कोवळया मुलांचे शोषण होऊ नये. कलम ३९(च) नुसार स्त्री, बालक व युवकांना शोषणा पासुन आणि जैविक व भौतिक गरजांच्या बाबतीत आवश्यक संरक्षण दिले जावे. कलम ४२ नुसार कामाबाबत न्याय, मानवीय परिस्थिती, प्रसुती विषयक सहाय्य उपलब्ध करण्यात येईल. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाला मुलभूत अधिकाराचा दर्जा प्राप्त करवून दिला. शिक्षण विषयक तरतूदींना घटनात्मक संरक्षण प्राप्त करून दिले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य**

२० जुलै १९२४ रोजी त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. दलितवर्गामध्ये शिक्षणाचा प्रचार प्रसार करणे, वाचनालये, समाज केंद्रे, प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा तसेच औद्योगिक, कृषी शाळा उघडून दलित वर्गाची आर्थिक स्थिती सुधारणे हे उद्दीष्ट होते.

१९२८ मध्ये दलित वर्ग शिक्षणसंस्थेची (Depressed Classes Education Society) ची स्थापना केली व दलित वर्ग आणि मुलांना शिक्षण वसतिगृह पुरवण्यासाठी मुंबई शासनास आवाहन केले. ९०० वार्षिक अनुदानाची गुंतवणूक करणाऱ्या या पाच वसतिगृहाचे व्यवस्थापन या संस्थेवर सोपवले.

महाविद्यालयीन मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून १९४५ मध्ये मुंबई येथे पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. २० जून १९४६ मध्ये पिपल्स एज्युकेशन सोसायटी अंतर्गत सिद्धार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय सुरू केले. १९ जून १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद कला आणि विज्ञान महाविद्यालय, १९५३ मध्ये मुंबई येथे सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय तर १९५६ मध्ये सिद्धार्थ विधी महाविद्यालय हे त्यांच्या महापरिनिर्वाण वर्षी सुरू केले. मुलांसाठी शाळा, महाविद्यालय

व वसतिगृह सुरू करून अस्पृश्य बांधवांना संघटीत केले. सन १९२५-२६ मध्ये मुंबई विधिमंडळात मुंबई विद्यापीठ दुरूस्ती कायदा चर्चेला आणला व त्यामध्ये विद्यापीठाविषयी विचार व्यक्त केले. विद्यापीठांच्या शैक्षणिक उपक्रमांना गती देणारे अध्यापकमंडळ हवे, विद्वावांना निर्णयाचे स्वातंत्र्य हवे, पदव्या देण्याचे कायदे करावेत, अभ्यासक्रमाची आखणी करून ते राबवावेत. अध्यापन पद्धती कोणती योजायची याचा निर्णय करावा असे अनेक विचार त्यांनी मांडले. विविध परिषदां मधून तसेच आपल्या लिखाणातून हिंदूकोड बिलाच्या माध्यमातून, राज्यघटनेतून स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार करून स्त्रीयांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. मुंबई, औरंगाबाद, पंढरपुर, सोलापूर येथे शिक्षणसंस्था व वसतिगृहांची स्थापना करून आपले शिक्षणविषयक उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोध निबंधा मधून असे स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तीमत्त्व अनेकविध पैलूंनी व्यापलेले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्याचा कृतीयुक्त व्यासंग, दैदिप्यमान म्हणून अधोरेखित असून त्यांच्या व्यासंगातील प्रत्येक पैलू हा अनुकरणीय व पथदर्शक असा आहे.

१) भारतीय शिक्षणाच्या परिप्रेक्षात डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण मानवतावादी मुल्येवर्धीत करण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतली आहे. विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, प्राचार्य आणि शिक्षणसंस्थेचे निर्माते असा चढता आलेख त्यांच्या शैक्षणिक योगदानात पहायला मिळतो.

२) २१व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा संदर्भ नुसताच प्रेरणादायी नसून मूलगामी परिवर्तन करण्यास सहाय्यभूत ठरणारा आहे.

३) त्यांच्या शैक्षणिक विचारांची खोली, व्यापकता, समर्पकता, पारदर्शकता न्यायिकता या सर्व बाबींना पुन्हा उजाळा देण्याची गरज निर्माण झाली आहे.

४) त्यांचा शैक्षणिक विचारांचा संदर्भ व उपयोगिता ही कालसापेक्ष नसून कालनिरपेक्ष आहे त्याची जाणीव प्रकर्षाने होते.

५) डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणविषयक अत्यंत तळमळीने मांडलेले शिक्षणविषयक मूलभूत विचार अंमलात आणल्यास शिक्षण हे व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्व विकासाचे व समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरेल.

६) शिक्षणविषयक संविधानात्मक तरतुदीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षणविषयक स्वातंत्र्य व अधिकारांचे खरे व खंबीर संरक्षक ठरतात. त्यांनी केलेल्या संविधानात्मक तरतुदीमुळे स्त्रीशिक्षण, स्त्रीसंरक्षण यांना कायदेविषयक चौकट निर्माण होऊन स्त्रीमुक्ततेचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

७) भारतीयांच्या उद्धारासाठी सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात वाचनालये, अभ्यासमंडळे, शिक्षणसंस्था स्थापन करून हिन दीन व उपेक्षितांना शिक्षणाची प्रेरणा दिली, सभा, मेळाव्यांमधून शिक्षणास उदयुक्त केले.

**संदर्भ**

१) कीर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, २०१२.

२) भिडे जी. एल., पाटील एन. डी.,'महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास', फडके प्रकाशन मुंबई, २००३.

३) डोईफोडे ज्योती, 'मूलभूत सामाजिक विचार', विद्या बुक पब्लीशर्स औरंगाबाद, २००५.

४) अग्रवाल जे. सी.,'शिक्षणामध्ये उदयोन्मुख भारत', दिल्ली, १९९९.

५) फडके भालचंद्र, 'फुले-आंबेडकर शोध आणि बोध', आनंद प्रकाशन औरंगाबाद, १९९८.

६) कुलकर्णी बी. डी. व इतर, 'आर्थिक विचार व विचारवंत', डायमंड पब्लिकेशन पुणे, २००८.

७) रघुवंशी रमेश, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जनतेला केलेला उपदेश', रघुवंशी प्रकाशन कोल्हापूर, १९९७.

८) डॉ. विठ्ठल पी., डॉ कुंभार नागोराव,'सर्वदर्शी डॉ बाबासाहेब आंबेडकर , डायमंड पब्लिकेशन पुणे,२०१७

९) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रायटिंग अँड स्पीचेस १९८९ एज्युकेशन डिपार्टमेंट गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र मुंबई

१०) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि लेखणे खंड १४ भाग २ पान १३,१९

११) फडके भालचंद्र, 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह', श्री विद्या प्रकाशन, पुणे १९७७